क्र.२०११/आरबी/डेस्क-३/पिपाटं-२१२
**जिल्हाधिकारी कार्यालय, बीड**
दिनांक : ३० जुलै २०११

**निविदा सूचना :-**

१ ऑक्टोबर २०११ ते ३० सप्टेंबर २०१२ या कालावधी करीता बीड जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना/वाड्यांना, टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी अनुभवी व सक्षम कंत्राटदाराकडून याव्दारे सिलबंद निविदा मागविण्यांत येत आहेत.

इच्छूक कंत्राटदारानी दिनांक २२.८.२०११ चे दुपारी १५.०० वाजेपर्यन्त जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत सिलबंद निविदा सादर कराव्यात. निविदा दिनांक २३.८.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे उपस्थित कंत्राटदार/अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील. ज्या कंत्राटदारांना काळ्या यादीत घोषीत केले असेल किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्यांचेशी संलग्न असलेले कंत्राटदारांनी निविदा भरु नयेत. अशा कंत्राटदारांनी निविदा भरल्यास त्यांची निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**१.** निविदाचे कोरे फॉर्म दि.१.८.२०११ ते १९.८.२०११ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी १७.०० वाजेपर्यन्त नापरतावा रक्कम रु.२०००/- (रुपये दोन हजार फक्त) ट्रेझरी बँकेत चलनाने भरणा केल्यास मिळतील.
**२.** निविदाच्या तपशिलवार अटी / शर्ती निविदा फॉर्म सोबत दिल्या जातील.
**३.** निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावी लागेल.
**४.** लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पुर्तता न केल्यास लिफाफा क्र.२ उघडण्यांत येणार नाही.

**अ) लिफाफा क्रमांक (१) : "तांत्रिक निविदेचा लिफाफा"**

१. या लिफाफ्यात बयाणा रक्कम रु.५०,०००/- चा राष्ट्रीकृत बँकेचा मा.जिल्हाधिकारी बीड यांचे नांवाने काढलेला सी.डी.आर.
२. १० टँकर/ट्रक स्वतःचे मालकीच्या असल्याचे पूरावे व निविदापत्रामध्ये दिलेल्या विहीत नमुन्यात माहिती द्यावी.
३. गाड्यांचे नोंदणी (रजिस्ट्रेशन) केल्याचा पुरावा.(आर.सी.बुकाच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती).
४. वाहन कर (आर.टी.ओ.कडील टॅक्स) भरणा केल्याचे प्रमाण पत्र/पुरावा.
५. टँकर/ट्रक सुस्थितीत असल्याचे आर.टी.ओ.चे चालू वर्षाचे प्रमाण पत्र.
६. स्पिडोमिटर दुरुस्त असल्या बाबतचे आर.टी.ओ.चे चालू वर्षाचे प्रमाण पत्र.
७. विमा प्रमाणपत्र.
८. चालू वर्षाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र.
९. भार वहन क्षमता परवाना (परमीट)
१०. टँकर/ट्रकवरील टाकीची पाणीवहन क्षमता आर.टी.ओ.ने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.
११. इत्यादी तपशिलवार अटी व शर्ती नुसार.

**ब) लिफाफा क्रमांक (२) : "या लिफाफ्यामध्ये निविदा फॉर्ममध्ये विहीत केलेल्या प्रपत्रांत दर भरुन पूर्ण निविदा फॉर्म अटी व शर्तीसह सिलबंद करुन सादर करावा लागेल."**

**५.** प्रस्तुतची निविदा सूचना वेबसाईट http:/beed.nic.in वर उपलब्ध आहे.
**६.** निविदा उघडण्याची तारीख, वेळ आवश्यक असल्यास बदलण्या बाबतचे अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवले आहेत.

स्थळ : बीड
दिनांक : ३० जुलै २०११.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी बीड**